# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/07/2021 (बुधवार)


## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत 1.5 कि. मी. अंतरावर एमजी नगर रेल्वे फाटका जवळ कन्हान येथे दिनांक 13/07/2021 चे 04.00 वा. दरम्यान तारसा चौकात पो.स्टे. कन्हान स्टाफ नाकाबंदी करीत असतांना एक स्कॉरपिओ गाडी थोडया अंतरावर येवुन थांबली व पोलिसांना पाहुन सदर वाहन चालकाने त्याचा ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन एमजी नगर रेल्वे फाटकाला धडकल्याने गाडीचे काच फुटले. सदर स्कॉरपिओ गाडी मधील आरोपी नामे– 1) मुस्तकीम खान फिरोज खान रा. गांधी स्कुल जवळ, भाजी मंडी कामठी ह.मु. गड्डीगोदाम रेल्वे क्वॉर्टर झपोडपट्टी जवळ नागपुर, 2) मोहम्मद आसिफ मोहम्मद इक्बाल अन्सारी, रा. प्रवेश नगर यशोधरा रोड वांजरा लेआउट उपल्लवाडी मस्जीद जवळ नागपुर यांना अटक करण्यात आले असून सदर वाहनाची तपासनी केली असता एमएच– 05/एजे– 6466 क्रमांकाच्या स्कारपिओ गाडीला मध्ये 1 गोरा 2 गाय असे एकुण 3 गौवंश अंत्यत कुर व निद्रयतेने कोंबुन व आखुड दोरखंडाने आरोपीने कामठी येथे कत्तलीकरीता वाहतुक करून घेवुन जातांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातुंन 3 गौवंश किमती 11,000/–रू. व स्कॉरपिओ गाडी किमती 2,00,000/–रू. अशा एकुण कि. 2,11,000/– रू चा मुदेमाल मिळुन आला.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई मंगेश सोनटक्के, पो.स्टे. कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम 11 (1)(ए)(डी)(ई)(आय) प्राणि निर्दयतेने वागणुक प्रतिबंधक कायदा, सहकलम 5 ए 5 बी 9, 183 महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. यातील आरोपीतांना सुचनापत्रा वर रिहा करण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री. पाटील 8419953444 हे करीत आहे.

## घरफोडी

1) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 10 कि. मी. अंतरावरील मौजा चिंचभवन ता. पारशिवनी येथे दि. 12/07/2021 चे 13.30 वा. ते दि. 13/07/2021 चे 15.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– जगन्नाथ तेजराम हारोडे, वय 50 वर्ष, रा. चिंचभवन ता. पारशिवनी हे परीवारासह घराला कुलुप लावुन लग्नाला गेले होते. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने त्यांचे घराचे मुख्य दाराचे कुलुप तोडुन घराचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने बेडरूम मध्ये ठेवलेली लोखंडी आलमारीचे दार उघडुन त्यामध्ये ठेवलेली रोख रक्कम 10,000/–रू. चोरून गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथ आरोपीविरुध्द कलम 454, 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा फिरोज शेख9420253504 हे करीत आहे.

2) पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत दहेगाव फाटा वार्ड क्र 4 येथे दि 13/07/2021 ते 14/07/2021 चे 06.00 वा पुर्वी रात्री फिर्यादी नामे– ग.भा सोनाली राजकुमार चौधरी वय 32 रा दहेगाव फाटा, वार्ड क्र 4 या आपले काकाचे मुलीचे लग्नाकरीता दि 10/07/2021 रोजी कळमना नागपुर येथे आपले घर बंद करून व घराचे दाराला कुलुप लावुन कुटुबांसह गेल्या होत्या. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने चेनल गेटचे दरवाजे व लाकडी दरवाजाचे कुलुप तोडुन घराचे आत प्रवेश केले. यानंतर आरोपीने लोखंडी अलमारी मध्ये ठेवलेले एक तोळा सोन्याची चैन किंमती अंदाजे 20,000/– रू. व नगदी 8,000/– रू. तसेच एक ओपो कंपनीचा मोबाईल फोन बंद अवस्थेत किंमती 10,000/– रू. असा एकुण 38,000/– रू चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे.

## चोरी

1) पो.स्टे. बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील वार्ड क्र. 2 बुटीबोरी येथे दि. 13/07/2021 चे 12.30 वा. ते 15. 30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– यंशवंत बळीराम नैताम वय 33 वर्ष रा मोखडा भागेबोरी ता.भिवापूर जि.नागपूर ह.मु. सुधाकर चटप वार्ड क्र 2 बुटटीबोरी हा कामाला गेला होता. त्यादरम्यान फिर्यादींची पत्नी रिना नैताम हि तिच्या मुलीला ईंजेक्शन देण्याकरिता सरकारी दवाखाण्यात गेली असता परत घरी आली तर तिला घराच्या समोरील दरवाजा उघडा दिसला व घरातील सामान अस्त व्यस्त पडलेले दिसले. फिर्यादीचे पत्नीने पतीला फोन करून सांगितले फिर्यादीला सामान अस्त व्यस्त दिसले तेव्हा फिर्यादीचे पत्नीने फिर्यादीला सांगितले की, 'मुलीला ईंजेक्शन दयायच्या घाईमध्ये नजर चुकीने समोरील दरवाजा उघडा ठेवून गेली.'' त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घरामधील आलमारीचे लॉकर तोडुन लॉकर मध्ये ठेवलेले लेबर ला दयायचे नगदी 23,000/–रू., सोन्याचे दागिने कि. 9,000/–रू. असा एकुण किंमती 32,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. बोरी येथ आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशि गाते पो.स्टे बोरी मो.क्र 9923027214 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 0.5 कि. मी. अंतरावरील जोशी किराणा दुकानासमोर काटोल येथे दि. 13/07/2021 चे 11.30 वा. ते 12.00 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– रोशन लक्ष्मणराव वंजारी, वय 47 वर्ष, रा राठी ले आउट काटोल हे आपले हॉटेल व्यवसायाचे नगदी 1,40,000/– रू. बॅगमध्ये घेवुन अरविंद बॅक शाखा काटोल येथे बॅकमध्ये भरण्यास त्यांची स्कॉर्पिओ कारने जात होते. ते जोशी किराणा रोडवर आपली स्कॉर्पिओ कार उभी करून गाडीमध्ये किराणा माल टाकला व गाडीमध्ये असलेली नगदी 1,40,000/– रू. ची बॅग गाडीमधुन घेवुन जोशी किराणा दुकाना जवळुन आपले मित्राची मोटरसायकल घेवुन अरविंद बॅक शाखा काटोल येथे गेले व मोटरसायकल रोडवर उभी करून मोटरसायकलचे डिक्कीमध्ये ठेवलेली नगदी 1,40,000/– रू. ची पांढऱ्या रंगाची थैली दिसली नाही. अज्ञात आरोपीने पांढऱ्या रंगाची थैलीमध्ये असलेले नगदी 1,40,000/– रू. मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथ आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि राहुल बोन्द्रे 9823904141 हे करीत आहे.

## अपघात

1. पो.स्टे. मौदा :– आज दि. 14/07/2021 रोजी दुपारी 15.30 वा. चे सुमारास नागपूर वरून भंडारा कडे एक कंटेनर जात असता रावळी फाटा येथील डिव्हायडरवर एक पागल उभा राहुन कंटेनरला दगड मारल्याने कंटेनरच्या चालकाने आपले कंटेनरचा वेग कमी केला असता कंटेनरच्या मागे येत असलेली एमएच–40/एन–5567 क्रमांकाची एसटी बस चे चालकाचे वाहनावरील नियंत्रण न झाल्याने बस समोरील कंटेनरला मागेहुन धडक दिली. या अपघातात बसचा चालक नामे– रविन्द्र विक्रम जांगडे, वय 55 वर्ष, रा. साकोली, कंडक्टर नामे– माधुरी प्रशांत कठाणे, वय 30 वर्ष, रा. मुरमाडी ता. लाखनी यांचा पाय मुरघडला. तसेच बसमधील 10 ते 12 प्रवाशी किरकोळ जखमी झाले. जखमी नामे– 1. चरण धनश्याम मेश्राम, वय 24 वर्ष, रा. ता. देवरी, 2. राजकुमार प्रेमलाल जांभुळकर, वय 27 वर्ष, रा. विरीहीरगाव, 3. शरद देवीदास लिलारे, वय 67 वर्ष, रा. मौदा, 4. अमोल कठाण, वय 26 वर्ष, रा. वडोदा ता. कामठी व 5. शिवशंकर किसन काठोरे, वय 38 वर्ष, रा. पिपरी पुर्नवसन, ता. भंडारा हे जखमी झालेत.

घटनास्थळी तात्काळ पोलिस स्टेशन मौदा येथील पोलिस निरीक्षक श्री हेमंतकुमार खराबे व पोलिस स्टाफ पोहचुन बस मधील जखमी हयांना उपचाराकरीता माथनी टोल प्लाजाचे वाहनातुन भंडारा येथे रवाना करण्यात आले आहे.

2. पो.स्टे. मौदा :– दिनांक 05/07/2021 चे 18:30 वा. ते 19.00 वा. दरम्यान अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपले वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन बंडु शिवदास गायधने ( मृतक ), रा. भुगाव ता कामठी यास धडक मारून पळुन गेला. या अपघातात बंडु गायधने यांना उपचाराकरीता ग्रामीण रूग्णालय कुही येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन त्यास मृत घोषित केले. सदर गुन्हयाचे कागदपत्रे पो.स्टेला प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– संजय शिवदासजी गायधने वय 48 वर्ष रा. भुगाव ता कामठी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184, 134 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री आगासे 9130001715 हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 4 कि.मी अंतरावर मौजा टाकळघाट येथे दिनांक 13/07/2021 चे 13:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजेश नारायण सुर्यवंशी, वय 29 वर्ष रा. वार्ड क्र 4 टाकळघाट त. हिंगणा जि. नागपूर हा आई वडींला सह शेतात काम करण्यासाठी गेला होता. त्या दरम्यान त्याची पत्नी नामे– सौ. नेहा राजेश सूर्यवंशी( मृतक ) वय 23 वर्ष, रा. वार्ड न. 04 टाकळघाट हि घरी आजी रंगूबाई सह असतांना अज्ञात कारणावरून एकांतामध्ये घराचे छताचे हूकाला दुपट्टयाने गळफास घेतल्यानंतर ती मृत अवस्थेत आढळून आली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास मपोउपनि पल्लवी काकडे 9156283876 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर